प्रकरण चौथे

# उपसंहार

प्रकरण चौथे

# उपसंहार

---

सत्यशोधक समाजाचे कार्य महात्मा जोतिबा फुलेंच्या मृत्यूनंतर हळूहळू कमी होऊ लागले. परंतु राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या प्रेरणेने १९११ नंतर महाराष्ट्रातील अनेक भागामध्ये सत्यशोधक चळवळीची नव्याने सुरूवात झाली. कोल्हापूर संस्थानामध्ये खुद्द शाहू महाराजांचा राजाश्रय असल्यामुळे ही चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली. सातारा जिल्ह्यामध्ये सुद्धा या चळवळीने याच कालखंडामध्ये मुळ धरले. धर्मामधील ब्राह्मणी वर्चस्व नष्ट करणे, समाज साक्षर करणे, जातीयता नष्ट करणे, अंधश्रद्धा दूर करून समाज विज्ञाननिष्ठ बनवणे हे या समाचे प्रमुख उद्देश होते. सन १९१९ पासून ते १९५० पर्यंतच्या कालखंडात सातारा जिल्ह्यामध्ये सत्यशोधक चळवळीने महत्वपूर्ण अशी कामगिरी बजावली. सत्यशोधक चळवळीच्या कार्याचा प्रभाव चांगल्या प्रकारे होऊन सातारा जिल्ह्यामध्ये लोकजागृती घडून आली. सत्यशोधक चळवळीने नेमके कोणत्या स्वरूपाचे काम केले या कामाचा समाज जीवनावर कसा प्रभाव पडला याचा अभ्यास म्हणजे हा लघु शोधनिबंध होय.

## प्रबंधाचा सारांश

या प्रबंधाचा प्रामुख्याने सातारा जिल्ह्यामध्ये सत्यशोधक समाजाने केलेल्या कार्याची माहिती घेण्यात आलेली आहे. या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये सातारा जिल्ह्याची २० शतकातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थिती कशी होती याची माहिती देण्यात आलेली आहे.

गावगाड्याचे लेखक त्र्य. नि. अत्रे यांनी गावगाड्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील लोकजीवन हे २० व्या शतकाच्या प्रारंभी होते. तत्कालीन सातारा जिल्ह्यातील तडसर गावातील रामचंद्र तुकाराम पाटील यांनी लिहिलेल्या २० व्या शतकारंभीचा ग्रामीण महाराष्ट्र यामधून जी माहिती दिलेली आहे ती माहिती २० व्या शतकारंभीच्या सातारा जिल्ह्याशी मिळणारी आहे. सातारा जिल्हा गॅझेटिअरचा आधर घेऊन हे प्रकरण लिहिण्यात आलेले आहे. २० व्या शतकांरभीच्या सातारा जिल्ह्यातील लोकजीवन, समाजव्यवस्था यामध्ये विशेष अशी काही स्थित्यंतरे झालेली नव्हती. जातीव्यवस्थेची कडक बंधने पाळण्यात येत असत. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. साक्षरतेचे प्रमाण ३ ते ४% च्या वर नव्हते. देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील, इनामदार, मिरासदार या घटकांचे समाजावर वर्चस्व होते. इंग्रजांनी सुरू केलेल्या शाळामुळे शिक्षणाच्या बाबतीत लोकांच्यात थोडाफार प्रसार झालेला होता. बहुजन समाज जागृत नसल्यामुळे इंग्रज सरकारच्या सुधारणांचे फायदेही ब्राह्मण आणि तत्सम वरिष्ठ वर्गालाच मिळते होते. गावगाड्यामध्ये कुणबी, धनगर, माळी या जाती निरनिराळ्या विभागात बहुसंख्येने होत्या. तर गावकुसाच्या बाहेर असणाऱ्या जाती आपले गतानुगतीक असे जीवन कोणतीही तक्रार न करता जगत होत्या. विसाव्या शतकारंभीच्या सातारा जिल्ह्यातील लोक बहुसंख्येने निरक्षर, हलाकीचे, आर्थिक जीवन व धार्मिक वर्चस्वाखाली जगत होते. सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाचे नेमके कार्य सांगता यावे म्हणून २० व्या शतकारंभीचा सातारा जिल्हा कसा होता हे या प्रकरणातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या लघुशोधनिबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात सत्यशोधक चळवळ स्वरूप, व्याप्ती आणि त्याचे तत्वज्ञान मांडण्यात आले आहे. सत्यशोधक चळवळीच्या तत्वज्ञानाचा आधार घेऊनच तिसऱ्या प्रकरणामध्ये सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाचे कार्य मांडण्यात आलेले आहे. सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीची सुरूवात ही कै. केशवराव विचारे गुरुजी यांच्या अथक

प्रयत्नातून सुरू झाली. सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाने शिक्षण प्रसाराच्या कार्यामध्ये मोठी कामगिरी बजावलेली आहे आणि या कामात रयत शिक्षण संस्थेचे योगदान मोठे आहे. विचारे गुरुजींनी शेतकरी वर्गामध्ये जागृती घडवून आणली. सत्यशोधक पद्धतीने विवाह विधी सुरू करून ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान दिले. लोक प्रबोधनासाठी सत्यशोधक जलसा, तमाशा सुरू करून लोकांना ब्राह्मणी वर्चस्व सोडून देण्यास प्रवृत्त केले. अनेक गावांमध्ये पुरोहिताविना धार्मिक विधी पार पाडले जावू लागले. एकंदरीत सातारा जिल्ह्यात सत्यशोधक समाजाने केलेल्या कामामुळे लोकजागृती घडून आली आणि त्याचा योग्य तो परिणाम म्हणजे सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी मं. गांधीजीच्या नेतृत्वाने सुरू असलेल्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग गेतला. १९४२ मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकारची स्थापना करून इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. अगदी सुरूवातीच्या काळामध्ये साताऱ्यातील सत्यशोधक चळवळ ब्रिटिश सत्येवर विश्वास व्यक्त करीत होती. त्याच चळवळीतील नेत्यांनी पुढील काळात इंग्रजी सत्ता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करून स्वांतत्र्याच्या लढ्यात आपले योगदान दिले. या प्रकरणामध्ये सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीच्या संपूर्ण कार्याची माहिती दिलेली आहे.

अशाप्रकारे सातारा जिल्ह्यातील सत्यसोधक चळवळ या माझ्या शोधनिबंधाच्या अभ्यासाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे दिसून येतात.

## अभ्यासाचे निष्कर्ष

### १) धार्मिक वर्चस्व नष्ट करण्याचा प्रयत्न

सातारा जिल्ह्यामध्ये सत्यशोधक चळवळीच्या प्रयत्नाने ब्राह्मण पुरोहितांचे धार्मिक वर्चस्व नष्ट करण्याचे प्रयत्न झाले. महाराष्ट्रातील बहुजन समाजाला जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि मृत्यूनंतरही

त्या व्यक्तीला कर्मविपाकाच्या सिंद्धातांने परिबद्ध आलेले होते. सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक समाजाने ब्राह्मणी वर्चस्वाविरोधात लोकजागृती करून लोकांमध्ये सत्यशोधक समाजाचे परमेश्वर व भक्त यांच्यामध्ये मध्यस्थ असता कामा नये या तत्वज्ञानाची शिकवण दिली. लग्नाच्या विधींना ब्राह्मण पुरोहित न बोलविता सत्यशोधक पद्धतीने विवाह घडवून आणले जाऊ लागले. या विरोधात ब्राह्मणांनी आपल्या धार्मिक अधिकारावर गडांतर येत असल्याच्या तक्रारी ब्रिटिश सरकारकडे केल्या. परंतू संपूर्ण बहुजन समाजच ब्राह्मणी धर्मसत्तेच्या विरोधात जागृत होऊ लागल्यामुळे त्याचा फारसा उपयोग झाला नाही. लोकांमधील जुन्या रूढी, अंधश्रद्धा, विधवा पुनर्विवाह, वाईट चालीरीती इत्यादी गोष्टी नष्ट व्हाव्यात म्हणून लोकांना मनोरंजनाच्या कार्यक्रमातून लोकांचे प्रबोधन करण्यास सुरूवात केली. केशवराव विचारे, पर्बतराव साबळे, ज्योत्याजीराव फाळके, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादींनी सत्यशोधक जलशाची स्थापना करून, अनेक कार्यकर्ते तयार करून गावोगावी सत्यशोधक जलशांचे कार्यक्रम केले. या सत्यशोधक जलशांचा फार मोठा परिणाम लोकांवर होऊ लागला. त्यामुळे लोक ब्राह्मणी वर्चस्व झुगारून देण्याच्या मानसिकतेकडे मोठ्या प्रमाणात वळू लागले. त्या काळातील काँग्रेसचे वर्चस्व हे ब्राह्मण जातीच्या पुढाऱ्यांकडे होते. तसेच ब्राह्मण सभा, मोठ्या प्रमाणात असलेल्या पुरोहित वर्गाने ब्रिटिश सरकारकडे सत्यशोधक समाजाचे लोक तमाशाच्या आणि जलशाच्या माध्यमातून आमच्या देवदेवतांची विटंबना करीत आहेत. शिवाय ब्राह्मण समाजाची निंदानालस्ती करीत आहेत. सत्यशोधक समाजाचे हे कृत्य ताबडतोब थांबवावे म्हणून ब्राह्मण समाजाने सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक जलशावर बंदी घालण्यासाठी सरकारकडे तक्रारी अर्ज दाखल केले. अनेक वेळा तालुका मॅजिस्ट्रेट व जिल्हा मॅजिस्ट्रेटनी या तमाशावर बंदी घालण्याचे आदेशही दिलेले आहेत.[१] तरीही सत्यशोधक जलशांचा जोर वाढतच राहिला. या जलशांना लोकांमध्ये मान्यता मिळू लागली आणि अशाप्रकारे समाजात ब्राह्मणी धर्म वर्चस्वाविरूद्ध सातारा जिल्ह्यात सत्यशोधक

चळवळीमुळे अभूतपूर्व अशी लोकजागृती घडून आली.

२) शैक्षणिक कार्य

सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणून सत्यशोधक चळवळीने केलेल्या सैक्षणिक कार्याची नोंद घ्यावी लागेल. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील काले येथे झालेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये शिक्षणाशिवाय समाज शहाणा होणार नाही या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करून समाज शहाणा करायचा असेल तर त्याला शिक्षण दिले पाहिजे या मतावर सत्यशोधक समाजाचा दृढ विश्वास होता. कोल्हापूर संस्थानामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे सातारा जिल्ह्यातील अनेक लोकांना शिक्षणाची संधी मिलाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर शाहू महाराजांच्या कार्याचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची संपूर्ण जबाबदारी घेऊन या कार्याला सुरूवात केली. १९२४ मध्ये सातारा येथे शाहू बोर्डींगची स्थापना करून जिल्ह्यातील दुर्गम व अतिमागास भागातील सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना सातारा येथे आणून या बोर्डींगमध्ये राहण्या जेवण्याची सोय करून त्यांची माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय केली आणि या विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक सत्यशोधक विचारांची शिकवण दिली. या विद्यार्थ्यांच्या मदतीने ग्रामीण भागात जेथे सरकारी शाळा नसेल तेथे सह्याद्री पर्वताच्या दुर्गम भागात व दहिवडी, विटा अशा दुष्काळी भागात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी व्हॉलंटरी स्कूल सुरू केले. या शाळामध्ये शिकवणारे शिक्षक सत्यशोधक विचाराचे अल्यामुळे त्यांनी खेड्यापाड्यात बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी समर्पित आणि त्यागी वृत्तीने काम करून शिक्षण दिले. १९३५ नंतर रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्ह्याच्या निरनिराळ्या परिसरात माध्यमिक शिक्षणाची सोय असणाऱ्या शाळा स्थापन केल्या.[२] या शाळामधून सातारा जिल्ह्यातील सर्व जाती जमातीच्या हजारो मुलामुलीना शिक्षण मिळाले आणि सातारा जिल्ह्याला पुरोगामी विचाराचा चेहरा

प्राप्त झाला. तत्कालीन मुंबई इलाख्यामध्ये १९४७ च्या दरम्यान सातारा जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण हे सर्वात जास्त होते. सत्यशोधक समाजाच्या कार्यामुळे आणि खासकरून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अथक प्रयत्नातून सातारा जिल्ह्यात मोठे शैक्षणिक कार्य घडून आले. या शैक्षणिक कार्याचा फायदा दलित, भटकेविमुक्त, आदिवासी, शेतकरी, धनगर, माळी व बलुतेदार आलुतेदार यांना मिळाला. या सर्व शैक्षणिक प्रगतीचे श्रेय सत्यशोधक समाजाने केलेल्या सुरूवातीच्या प्रयत्नाना आहे. १९३७ नंतर सातारा जिल्ह्यातून ब्राह्मणी नेतृत्व जाऊन बहुजन समाजाचे नेतृत्व आले. याचे गमक कर्मवीरांनी केलेल्या शैक्षणिक कार्यात आहे.

३) अस्पृश्यता निर्मूलन

सत्यशोधक समाजाच्या कार्याचे मूल्यमापन करीत असताना या समाजाने ब्राह्मणी वर्चस्वाविरूद्ध केलेल्या कार्याची नोंद प्रामुख्याने घेतली जाते. सत्यशोधक चळवळीमध्ये प्रामुख्याने मराठा, धनगर, माळी या जातीतील लोकांचे वर्चस्व होते. परंतु गांवकुसाबाहेर राहणाऱ्या महार, मांग, चांभार, ढोर या जातीतील सभासद अत्यल्प असल्याचे दिसते. सत्यशोधक समाज अस्पृश्यता निर्मूलनासाठी सहभोजनाचे कार्यक्रम आयोजित करीत होता. जाती नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला असला तरी प्रत्यक्षात मात्र कृतीशील उदाहरणे फारच कमी दिसत होती. सातारा जिल्ह्यामध्ये विचारे गुरुजी आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यता निर्मूलनात प्रबोधनाचे काम जोरदार सुरू करण्यात आले होते. परंतु समाजाची मानसिकता फारशी बदलली नव्हती. रयत शिक्षण संस्थेच्या कार्यामुळे मात्र सातारा जिल्ह्यात अस्पृस्यता नष्ट होण्यास फार मोठी मदत झाली. उदाहरणच द्यावयाचे झाले तर अलीकडच्या काळामध्ये मुंबईतील वरळी येथे झालेल्या जातीय दंगलीत सवर्ण आणि दलित असा संघर्ष झाला त्यावेळेला सर्वणांनी दलितावर हल्ला केला. यावेळी दंगलीची चौकशी करण्यासाठी पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु देवदत्त दाभोळकर यांच्या

अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला वरळी येथील काही सवर्णांनी दलितांना आश्रय दिल्याचे दिसून आले. या सवर्णांनी या दंगलीमध्ये भाग घेतलेला नव्हता. तेव्हा त्यांना विचारण्यात आले की, तुम्ही या दंगलीमध्ये का भाग घेलता नाही ? यावेळी उत्तर देताना त्यांनी असे सांगितले की, आम्ही सातारा जिल्ह्यातील असून आमच्यावर रयत शिक्षण संस्थेच्या विचारांचा प्रभाव असल्यामुळे आम्ही दंगलीमध्ये भाग घेतला नाही.[३] यावरून सातारा जिल्ह्यामध्ये सत्यशोधक समाजाने अस्पृस्यता निर्मूलनाच्या संदर्भात मोठे कार्य केले होते हे दिसून येते.

४) <u>सहकार चळवळ</u>

सातारा जिल्हायातील सत्यशोधक चळवळीचे प्रणेते केशवराव विचारे यांनी सावकारशाहीतून लोकांची मुक्तता व्हावी म्हणून सातारा जिल्ह्यात सहकार चळवळ सुरू केली. प्रामुख्याने शेतकरी डोळ्यासमोर ठेवून त्यांनी सातारा, वाई, खटाव, कोरेगाव या तालुक्यामध्ये को. ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायट्या संघटीत केल्या. जांभूळवाडी येथे कृषी औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. फाळके पाडळी येथे सामुदायिक शेती सहकारी सोसायटी स्थापन केली. भक्तवडी येथे भक्तवडी सामुदायिक शेती सोसायटी स्थापन करून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सहकारी तत्वावर सातारा जिल्हा शेतकरी संघाची स्थापना केली. अशाप्रकारे सत्यशोधक समाजाच्या वतीने सातारा जिल्ह्यामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्याला सावकारशाहीच्या जोखडातून मुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

५) <u>स्वातंत्र्याचा लढा</u>

सातारा जिल्ह्याच्या सत्यशोधक चळवळीचे भारताच्या स्वांतत्र्यलढ्याला मोठे योगदान मिळालेले आहे. सत्यशोधक चळवळीच्या नेत्यांचा महात्मा गांधीजीच्या चळवळीवर विश्वास होता.

पुण्याचे सत्यशोधक चळवळीचे पुढारी केशवराव जेधे यांनी काँग्रेसच्या चळवळीमध्ये प्रवेश केला तर महाराष्ट्राच्या १९४२ च्या स्वांतत्र्यलढ्याच्या अग्रणी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९२७ पासून सक्रीय सहभाग घेण्यास सुरूवात केली. क्रांतिसिंह नाना पाटील हे स्वतः सत्यशोधकी विचारसरणीचे कार्यकर्ते होते. सुरूवातीच्या काळात नाना पाटील सत्यशोधक जलशामधून समाज प्रबोधनाचे कार्य करीत असत. नाना पाटलांचे सहकारी सत्यशोधक चळवळीमध्ये सक्रीय होते. सन १९३५ नंतर सातारा जिल्ह्यातील अनेक सत्यशोधकी विचाराच्या कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रीय भाग घेतला. क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. लाड, भगवानराव मोरे, शंकरराव निकम, रावजी मोहिते, वाय. सी. पाटील, नागनाथआण्णा नायकवडी बाबूजी पाटणकर, इंदूताई पाटणकर इत्यादींवर सत्यशोधकी विचारांचा प्रभाव होता. यांच्यामुळे सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्य सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचले आणि बहुजन समाज स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये सहभागी झाला. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व सातारा जिल्ह्यातील ज्या नेत्यांनी केले त्यांच्यावर म. फुले आणि त्यांच्या सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता म्हणून सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीच्या नेतृत्वाने पुढील काळात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली.

सत्यशोधक समाजाचा आवाज ही समाजातील अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ वर्गाची किंकाळी होती. आधुनिक भारतात सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज. ब्राह्मण समाजाने जमेल त्या मार्गाने विरोध करूनही सत्यशोधक समाजाने सामाजीक गुलामगिरी विरूद्ध आवाज उठविला. सामाजिक न्यायाची आणि पुनर्रचनेची मागणी केली. या चळवळीचा सातारा जिल्ह्यावर मोठा परिणाम झाला.

बहुजन समाजात शिक्षणाची आवड निर्माण होऊन ग्रामीण भागात शिक्षणाचे लोण पोहोचले.

धर्माच्या नावाखाली ब्राह्मण समाजाने चालविलेल्या शोषणाची शूद्रातिशूद्रांना जाणीव झाली. कमी खर्चात ब्राह्मण पुरोहितांच्या गैरहजेरीत लग्ने लावली गेली. इतर धार्मिक विधीतील ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारले गेले. समाजाच्यावतीने गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविली गेली, गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या दिल्या. सहभोजनाचे कार्यक्रम राबविले. जातीभेद, वर्णव्यवस्था, सावकारशाही, पुरोहितशाही व मूर्तीपूजेला जबरदस्त धक्का दिला गेला.

## संदर्भ

१. मुंबई पुराभिलेखागार, होम डिपार्टमेंट, फाईल नं. ३६३ - १९३२ पृ. १९५-१९८

२. रयत शिक्षण संस्था, अमृत महोत्सव स्मरणिका

३. मुलाखत - पाटील टी. एस्., सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते दि. १५/२/२००३

# संदर्भ ग्रंथ सूची


## ✷ प्राथमिक साधने

१. सत्यशोधक विद्यार्थी संघ - कागदपत्रे

२. सत्यशोधक विद्यार्थी संघ - प्रतिज्ञापत्र

३. कॉरस्पॉन्डन्स विद्यार्थी संघ - कागदपत्रे

४. पोस्टल क्लासच्या विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम.

५. केशवराव विचारे 'सहकारी वसाहत' योजना व संपूर्ण आराखडा - १९३४

६. जांभूळवाडी इंडस्ट्रियल कॉलनी - कागदपत्रे

७. फाळके पाडळी सामुदायिक शेती - सहकारी सोसायटी लि. कागदपत्रे

८. भक्तवडी सामुदायिक सहकारी शेती सोसायटी लि. माहिती तक्ता १९४६

## ✷ अप्रकाशित एम. फिल. प्रबंध

१. जाधव उज्वला - केशवराव विचारे जीवन व कार्य

२. पाटील टी. एस. - कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, राजकीय चळवळीचा एक अभ्यास (इ. स. १९२२ ते १९४०)

३. नलवडे दमयंती बबन - सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्रियांचा सहभाग.

## ✷ मुलाखती

१. विचारे लक्ष्मण (आण्णा) दि. २४-५-२००२
मु. पो. इंदगाव जि. ठाणे

२. घाटगे पुंडलिक हरी (गुरुजी) दि. ७-७-२००२
कार्वेनाका, कराड, जि. सातारा.

३. शाहीर फरांदे प्रकाश पुंडलीक दि. १७-७-२००२
कामाठीपुरा, सातारा.

४. फाळके राजाराम बापू - दि. ७-१०-२००२
मु. पो. पाडळी, सातारारोड, जि. सातारा.

५. जाधव गोरख दत्ताजी दि. ७-११-२००२
मु. पो. भक्तवडी, ता. कोरेगाव, जि. सातारा.

६. जाधव वसंत दत्ताजी दि. ७-११-२००२
मु. पो. भक्तवडी, ता. कोरेगाव, जि. सातारा.

## ✳ संदर्भ ग्रंथ (दुय्यम साधने)


| | | |
|---|---|---|
| १. कीर धनंजय | - | 'महात्मा जोतीराव फुले' आमच्या समाजक्रांतीचे जनक पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण १९९६. |
| २. चव्हाण रा. ना. | - | निवडक वाङ्मय (संपा. ठोके मो. नि.) पारख प्रकाशन, बेळगाव, प्र. आ. मार्च १९८० |
| ३. नलावडे उज्वला | - | सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, अंजिक्य सहकारी मुद्रणालय, सातारा. |
| ४. वैद्य प्रभाकर | - | महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्मय गृह. प्रा. लि. गिरगाव, मुंबई, प्र. आ. १९७४. |
| ५. नरके हरी | - | (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्मय पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. मार्च २०००. |
| ६. कडियाळ डॉ. रा. अ. | - | 'सत्यशोधक कै. नामदार भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य', इंदुमती प्रकाशन, पाचगाव, प्र. आ. १९९०. |
| ७. पवार बा. ग. | - | 'क्रांतिसिंह नाना पाटील' प्रतिसरकारचा रोमांचकारी इतिहास मातृभूमी प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००१ |
| ८. पाटील रा. तु. | - | 'क्रांतिसिंह नाना पाटील' एक स्वयंभू ग्रामीण क्रांतीकारक |
| ९. पाटील सुभाष | - | समाजभूषण मोहिते आण्णा |
| १०.प्रधान ग. प्र. | - | 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' साधना प्रकाशन, पुणे दु. आ. १९८९ |

| | | |
|---|---|---|
| ११.मंगुडकर मा. पं. | - | 'महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ' जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे १९६५ |
| १२.बागल माधवराव खंडेराव | - | (संपा.) सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, १९३३, प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता सैनिक दल, नागपूर, पुनर्मुद्रण २००२ |
| १३.फाळके राजाराम बापू | - | केशवराव विचारे गुरुजी, जीवन दर्शन, प्रकाशक विचारे रामराव, सातारारोड, प्र. आ. नोव्हेंबर, १९८८ |
| १४.काटकर मा. भि. | - | प्रबोधनाची धगधगती मशाल, कर्मवीर भाऊराव पाटील कर्मवीर प्रबोधिनी, सातारा. |
| १५.पाटील विलास | - | क्रांतिसिंह नाना पाटील. |
| १६.खेड्यातील गरीबांची झुंज | - | क्रांतिसिंह मुक्त व्यासपीठ, विटा. (संपा. मंडळ) भाई संपतराव पवार, भाई रावसाहेब शिंदे, डॉ. गेल ओमवेट, डॉ. पाटणकर भरत इ. |
| १७.सातारा जिल्हा गॅझेट | - | कार्यकारी संपादक - सचिव - महाराष्ट्र शासन, मुंबई आ. १९९९. |
| १८.रानडे म. गो. | - | मराठी सत्तेचा उत्कर्ष व ऱ्हास. |
| १९.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | - | सातारा जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई २०००-२००१ |
| २०.पाटील रा. तु. | - | विसाव्या शतकारंभीचा ग्रामीण महाराष्ट्र, क्रांतीवैभव प्रकाशन, हणमंत वडिये, ता. खानापूर. |

## ✷ मासिके

१. गुजर जयवंत (संपा.) सत्यशोधक समाजप्रबोधन पत्रिका, सातारा, १९९०

२. गुजर जयवंत (संपा.) महाराष्ट्र भूषण, लोकशाहीर पुंडलीक फरांदे, सातारा, १९९२

३. गुजर जयवंत (संपा.) सत्यसंशोधन, सातारा, १९९८

४. गरूड शांताराम जयराम (संपा.) प्रबोधन प्रकाशन ज्योती, जुलै २००० समाजवादी प्रबोधिनी,

इचलकंरजी.

## ✷ वृत्तपत्रे

१. दै. राष्ट्रवीर - बेळगाव

२. साप्ता. नवयुग - मुंबई